**प्रेसनोट** दि. 29/09/2025

**अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे घटकाकडून लोणावळा शहर पोलीस स्टेशनमधील सहा.पोलीस उप निरीक्षकावर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे घटक** |
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | लोणावळा शहर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलमान्वये. |
| **तक्रारदार** | पुरुष, वय 42 वर्ष |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | शकील मोहम्मद शेख, वय 45 वर्षे, पद- सहाय्यक पोलीस उप निरीक्षक, लोणावळा शहर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. (वर्ग-3) |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | रू. 25,000/-(पंचवीस हजार रूपये) |
| **पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम** | रू. 20,000/-(वीस हजार रूपये) |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | रू. 20,000/- (वीस हजार) रुपये लाच रक्कम स्विकारली. |
| **पडताळणी दिनांक** | दि. 23/09/2025, 24/09/2025, 25/09/2025 |
| **सापळा दिनांक** | 29/09/2025 |
| **ठिकाण** | नारायणीधाम पोलीस चौकी, (लोणावळा शहर पोलीस स्टेशन अंतर्गत) लोणावळा. |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. प्रविण निंबाळकर पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9552574140) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्रीमती भारती मोरे, सहा. पोलीस आयुक्त, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9870156586) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार यांच्याविरुद्ध लोणावळा शहर पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये मदत करण्यासाठी तपासी अधिकारी या नात्याने सहाय्यक पोलीस उप निरीक्षक शकील मोहम्मद शेख हे 25,000/- रूपयांची लाच मागत असल्याची तक्रार तक्रारदार यांनी दिनांक 23/09/2025 रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे, यांचेकडे दिली होती.

यातील तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 23/9/2025, 24/09/2025 आणि 25/9/2025 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई केली असता दि. 25/9/2025 रोजीच्या पडताळणीमध्ये अलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांच्याविरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यांचे तपासामध्ये मदत करण्यासाठी साहेबांना देण्यासाठी म्हणून 25,000/- रूपये लाच मागणी करून तडजोडीअंती 20 हजार रूपयाची लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

वरील प्रमाणे लाच मागणी पडताळणी केल्यानंतर आज दि.29 सप्टेंबर 2025 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आरोपी लोकसेवक शकील शेख सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक यांना नारायणीधाम पोलीस चौकी,(लोणावळा शहर पोलीस ठाणे) मध्ये तक्रारदाराकडून 20,000/- रूपयाची लाच स्वीकारली असता रंगेहात पकडण्यात आले त्यांच्याविरुद्ध लोणावळा शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) **अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक** -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) **व्हॉट्स-अॅप क्रमांक -** 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) **ई-मेलआयडी - पुणे** dyspacbpune@mahapolice.gov.in
4) **वेबसाईट -** www.acbmaharashtra.gov.in
5) **ऑनलाईन अॅप तक्रार** - www.acbmaharashtra.net.in

29/9/25

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.
**(मोबाईल क्रमांक- 9423884745)**

सहायक पो.आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो
सत्यमेव जयते

Scanned with CamScanner